अ.शा.पत्र क्रमांक: एचडीओ-०२१५/प्र.क्र.३७/आस्था-१

गृह विभाग
महाराष्ट्र शासन
HOME DEPARTMENT
GOVERNMENT OF MAHARASHTRA

महाराष्ट्र शासन

डॉ. भूषण कुमार उपाध्याय, भा.पो.से.
प्रधान सचिव (विशेष)
Dr. Bhushan Kumar Upadhyay, I.P.S.
Principal Secretary (Special)

2nd Floor, Main Building,
दुसरा मजला, मुख्य इमारत,
Madam Cama Road,
मादाम कामा रोड,
Mantralaya, Mumbai 400 032.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
Tel.: 022-2202 3572 Fax : 022-2204 8317
E-mail : psec.homespl@maharashtra.gov.in

दिनांक : १३ जुलै, २०१५
Date :

O.G.
13 JUL 2015

आदरणीय सर,

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या पोलीस प्रशासनाकडून वाढल्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि. २७.०४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ (१) मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसुचित करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन गृह विभागाने दिनांक १०.०७.२०१५ रोजी, शासन मान्यतेने, यासंदर्भातील अधिसूचना निर्गमित केली आहे. सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडण्यात आली आहे. सदरहू अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवित असलेल्या सेवा, अधिनियमांतर्गत अधिसुचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे, हा उद्देश आहे.

२. सदरहू अधिसुचनेनुसार त्यामध्ये नमूद केलेल्या एकूण १७ सेवा राज्यातील सर्व पोलीस ठाणे, सर्व संबंधित पोलीस उपअधिक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालये, सर्व पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त कार्यालये, सर्व पोलीस आयुक्तालये व सह सचिव, गृह विभाग (खुद्द) यांनी नियत केलेल्या कालमर्यादेमध्ये सदरहू सेवा पात्र नागरिकांना पुरवावयाच्या आहेत. उक्त अधिसुचनेमध्ये नमूद केलेल्या सेवांकरीता निश्चित करण्यात आलेल्या नियत कालावधीमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना (पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी /सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालये, पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त कार्यालये, पोलीस आयुक्तालये इत्यादी) बदल करता येणार नाही.

३. राज्यातील सर्व संबंधित पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक यांनी वरीलप्रमाणे कलम-३ (१) नुसार निर्गमित केलेल्या अधिसूचनेची अंगलबजावणीची कार्यवाही तात्काळ प्रभावाने करण्याकरीता सर्व संबंधित पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक यांना निर्देश द्यावेत, ही विनंती.

Pl. immediately inform all unit cmds to forward to SDPO Police Stn ASP. Put on website
13/7/15
IG Adm.

Put up on website
13/7

13/7

5224
11/3/15

४. उक्त अधिसुचनेमध्ये दर्शविलेल्या सेवा जनतेकरीता उपलब्ध असतील, याची माहिती जनतेला होण्याच्या दृष्टीकोणातून अध्यादेशातील कलम-३ (२) नुसार या लोकसेवांची सूची, नियतकालमर्यादा, विहित नमुना किंवा फी असल्यास, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील अधिकारी यांचा तपशील सर्व पोलीस ठाणे, सर्व पोलीस उप विभागीय अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालये, सर्व संबंधित पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त व पोलीस आयुक्त कार्यालयांमध्ये दर्शनी भागावर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच, सदर सेवांबाबतची माहिती संकेतस्थळावर देखील ठेवण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

५. उक्त अध्यादेशातील कलम-३ अन्वये गृह विभागाच्या अखत्यारितील एकूण १७ सेवा दिनांक १०.०७.२०१५ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आल्या आहेत. म्हणून, वरील परिच्छेद-४ येथे नमूद केल्याप्रमाणे अध्यादेशातील कलम-३ (२) नुसार कार्यवाही करुन या सेवा उक्त अध्यादेशांतर्गत पुरविण्याची अंमलबजावणी तात्काळ प्रभावाने लागू करण्याकरीता आवश्यक दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना स्पष्ट निर्देश देण्यात यावेत व अंमलबजावणीचा सर्वकष एकत्रित अहवाल शासनास दि. २६.७.२०१५ पुर्वी सादर करावा, ही विनंती.

आपला विश्वासू, आपला स्नेहांकित

(डॉ. बी. के. उपाध्याय)

श्री. संजीव दयाल,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# अधिसूचना

गृह विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ३२.
दिनांक : १० जुलै, २०१५

क्रमांक : एचडीओ-०२१५/प्र.क्र३७/आस्था-१ : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, गृह विभाग, याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ गृह विभाग, मंत्रालय (खुद्द) कार्यालयाच्या अधिनस्त कार्यासनांमार्फत तसेच, पोलीस आयुक्त कार्यालये, पोलीस अधिक्षक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्ठामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे :-

## परिशिष्ठ

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिका-याचे पदनाम | प्रथम अपिल अधिका-याचे पदनाम | द्वितीय अपिल अधिका-याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी | अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन ७ दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग. | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/ सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |
| २ | कागदपत्रांचे साक्षांकन | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग. | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/ सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |
| ३ | भारतीय नागरिकांसाठी "नोरी" ( NORI) प्रमाणपत्र | अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग. | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/ सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |
| ४ | पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र | अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग. | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/ सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | विदेशी नागरीकांचे नागरीकत्वाचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग. | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/ सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |
| ६ | तक्रारदारास प्रथम खबरी अहवलाची (एफ.आय.आर.) प्रत पुरविणे. | नोंदणीनंतर तात्काळ | पोलीस ठाणे अंमलदार | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी / सहाय्यक पोलीस आयुक्त |
| ७ | ध्वनिक्षेपकाचा (लाऊडस्पीकर) परवाना देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ३ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी/ सहायक पोलीस आयुक्त | अपर पोलीस अधीक्षक/ पोलीस उपायुक्त |
| ८ | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना-हरकत परवाना देणे | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | कार्यालयीन अधीक्षक/ प्रशासकीय अधिकारी | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/ सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय/ प्रशासन) | पोलीस अधीक्षक/ पोलीस उपायुक्त (मुख्यालय) |
| ९ | सभा, संमेलन, मिरवणूक शोभायात्रा इ. करीता परवानगी देणे | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी / उपविभागीय पोलीस अधिकारी/पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय | उपविभागीय पोलीस अधिकारी/ अतिरिक्त पोलीस अधीक्षक | पोलीस अधीक्षक |
| | | | पोलीस ठाणे अधिकारी /सहा. पोलीस आयुक्त/ सहा.पोलीस आयुक्त,मुख्यालय | सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपआयुक्त/पोलीस उपआयुक्त, मुख्यालय | अतिरिक्त पोलीस आयुक्त/पोलीस सहआयुक्त |
| १० | विदेशी नागरिकांना निवासासाठी मुदतवाढ देणे/ ना-हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/ सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधिक्षक/ पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |
| ११ | भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/ सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधिक्षक/पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | पारपत्र पडताळणी साठी-ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/ सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/ पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |
| १३ | निमशासकीय, खाजगी संस्था इत्यादी मध्ये नोकरीकरीता वर्तणूक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/ सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/ पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |
| १४ | पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार इत्यादीकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/ सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |
| १५ | शस्त्र परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, शस्त्र परवाना | उपविभागीय पोलीस अधिकारी/ सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/ पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |
| १६ | भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र देणे. (शिक्षणासाठी/नोकरीसाठी प्रवेशपत्र (व्हीसा) | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/ पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक मुख्यालय/ सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/ पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |
| १७ | तिबेटीयन नागरीकांना भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक मुख्यालय/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेष शाखा |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr. B K Upadhyay

Digitally signed by Dr. B K Upadhyay

( डॉ. बी. के. उपाध्याय )
प्रधान सचिव ( विशेष )

**NOTIFICATION**

Home Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumai – 400 032.
Dated the 10th July, 2015.

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ORDINANCE, 2015.

No. HDO 0215/CR No. 37/HDO-1:-In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015 (Mah.Ord.No.V of 2015), the Home Department, hereby notifies the public services to be rendered to the eligible persons by its concerned Desks, the Police Commissioner Offices, Police Superintendent offices and its sub-ordinate offices, with the stipulated time limit along with the Designated officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith, for the purposes of the said Ordinance.

**SCHEDULE**

| Sr. No. | Public Service | Time limit for providing service (Days) | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer |
|---|---|---|---|---|---|
| *1* | *2* | *3* | *4* | *5* | *6* |
| 1 | Granting Permission to performance of Foreign Artists in Maharashtra. | 7 working days (After receipt of report) | Desk Officer, Home Department, Mantralaya. | Under Secretary, Home Department, Mantralaya. | Deputy/ Joint Secretary, Home Department, Mantralaya. |
| 2 | Attestation of Documents by Home Department. | 7 working days | Desk Officer, Home Department, Mantralaya. | Under Secretary, Home Department, Mantralaya. | Deputy/ Joint Secretary, Home Department, Mantralaya. |
| 3 | No Obligation to Return to India (NORI) Certificate for Indian Citizens. | 30 working days (After receipt of report) | Desk Officer, Home Department, Mantralaya. | Under Secretary, Home Department, Mantralaya. | Deputy/ Joint Secretary, Home Department, Mantralaya. |
| 4 | Police Clearance Certificate for foreign nationals. | 30 working days (After receipt of report) | Desk Officer, Home Department, Mantralaya. | Under Secretary, Home Department, Mantralaya. | Deputy/ Joint Secretary, Home Department, Mantralaya. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Submission of Citizenship proposals to Government of India. | 30 working days (After receipt of complete proposal) | Desk Officer, Home Department. | Under Secretary, Home Department. | Deputy/ Joint Secretary, Home Department. |
| 6 | Issue of copy of FIR to the Complainant | Immediately after registration | Police Station Officer | Station House Officer | Sub Divisional Police Officer/ Asstt. Commr. of Police |
| 7 | License for amplified sound system | 3 working days | Station House Officer | Sub Divisional Police Officer/ Asstt. Commr. of Police | Addl. Supdt. of Police/ Deputy Commr. of Police |
| 8 | NOC for license for amusement | 21 working days | Office Supdt./ Administrative Officer | Deputy Supdt. of Police(HQ)/ Asstt. Commr. of Police (HQ/ Admin) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (HQ) |
| 9 | Permission for peaceful assembly and procession | 7 working days | Station House Officer/Sub Divisional Police Officer/Deputy Supdt. Police (HQ) | Sub Divisional Police Officer /Addl. Supdt. of Police | Supdt. of Police |
| | | | Station House Officer/ Asstt. Commr. of Police/ Asst. Commr. of Police (HQ) | Asstt. Commr. of Police/Deputy Commr. of Police/ Deputy Commr. of Police (HQ) | Addl. Commr. of Police/ Jt. Commr. of Police. |
| 10 | NOC/ Issue of Extension of Residential Permit of foreigners | 7 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |
| 11 | NOC to return to India(NORI) Certificate | 7 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | NOC for passport verification | 21 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |
| 13 | Character Verification for Semi-Govt., Private Jobs (Character Antecedent Verification) | 30 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |
| 14 | NOC for petrol pump, gas agency, hotel, bar etc. | 21 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |
| 15 | NOC Arms License Verification | 21 working days | Police Inspector, District Special Branch /Police Inspector, i/c of arms License | Sub Divisional Police Officer/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |
| 16 | Police Clearance Certificate for Indian Nationals for going abroad (visa for studies, jobs) | 21 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |
| 17 | No Objection to return to India (NORI) permission in respect of Tibetans | 15 working days | Police Inspector, District Special Branch/Police Inspector, Special Branch. | Deputy Supdt. of Police (HQ)/ Asstt. Commr. of Police (Special Branch) | Supdt. of Police/ Deputy Commr. of Police (Special Branch) |

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. B K
Upadhyay

(Dr. B.K. Upadhyay)
**Principal Secretary (Special) to Government.**